# <u>स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन</u>

**<u>दि.१५ सप्टेंबर २०१७</u>**

**प्रस्तावना :**

शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र व वाणिज्य, इतिहास, इंग्रजी, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाअंतर्गत स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा दोन सत्रात संपन्न झाली.

**पहिले सत्र :-**

**अध्यक्ष :** मा.प्रा.डॉ.शालिनी पांडे

**प्रमुख अतिथी :**मा.प्रा.दीपक धुरंधर
(संचालक,करिअर पॉईट ॲकेड्मी,अमरावती.)

**दुसरे सत्र :-**

**अध्यक्ष :** मा. श्री.दत्तात्रय फिस्के
(उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी,जिल्हा परिषद,अमरावती.)
**प्रमुख मार्गदर्शक :**मा.श्री.प्रविण मोंढे
(वित्त व लेखा अधिकारी,जिल्हा परिषद,अमरावती.)
**आयोजक :** स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र व वाणिज्य,इतिहास,इंग्रजी,राज्यशास्त्र विभाग
**सहभाग :**बी.ए. व बी.कॉम. च्या उपस्थित विद्यार्थीनी संख्या ६०
**उद्देश :** १)विद्यार्थिनींना स्पर्धा परिक्षेची माहिती देणे.
२)विद्यार्थिनी मध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

**अहवाल**

स्पर्धा परिक्षा कार्यशाळेच्या प्रथम सत्राचे अध्यक्ष मा.डॉ.शालिनी पांडे ह्या होत्या.कार्यशाळेकरिता प्रमुख मार्गदर्शक मा.श्री.दीपक धुरंधर(संचालक करिअर पॉईट ॲकेड्मी अमरावती)हे होते.MPSC,UPSC,स्टाफ सिलेक्शन तसेच इतर सर्व स्पर्धा परीक्षेसंदर्भात सविस्तर माहिती श्री.दीपक धुरंधर यांनी दिली. विविध परीक्षांची माहिती देतांना त्या परीक्षांचा अभ्यासक्रम,तसेच त्याकरिता उपलब्ध साहित्य यावर सविस्तर विवेचन त्यांनी केले.विद्यार्थीनीना प्रेरित करीत असतांना ते म्हणाले कि,परीक्षेला दिसणारी गर्दी पाहून आपण नकारात्मक होवू नये कारण परीक्षेला येणारे नव्वद टक्के लोक हे सहज फॉर्म भरतात केवळ दहा टक्के लोक अभ्यास करून परीक्षा देतात आपण स्वतःला ह्या दहा टक्क्यामध्ये समाविष्ट केले तर यशापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून मा.श्री.प्रविण मोंढे (वित्त व लेखा अधिकारी जिल्हा परिषद,अमरावती)हे होते. विद्यार्थिनीना स्पर्धा

परीक्षेसंदर्भात प्रोत्साहित व प्रेरित करतांना श्री.प्रविण मोंढे यांनी स्वतःचे विद्यार्थीदशेतील अनुभव कथन केले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करीत असतांना कठोर परिश्रम करणे अत्यंत आवश्यक आहे.त्याशिवाय आपण आपले स्वप्न साकार करू शकत नाही हा संदेश त्यांनी विद्यार्थिनीना दिला.कार्यशाळेच्या व्दितीय सत्राचे अध्यक्ष मा.श्री.दत्तात्रय फिस्के (उपमुख्य वित्त व लेखा अधिकारी) यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये म्हटले कि यश आणि अपयश यांच्या मध्ये एका फुटाचे अंतर असते. आपण प्रयत्न करतो परंतु त्या प्रयत्नाप्रती निरंतरता असणे आवश्यक आहे. यशाला कुठलाही शॉर्टकट नसतो त्या करिता मेहनतच करावी लागते.

विद्यार्थीनिंमध्ये स्पर्धा परीक्षेविषयी सकारात्मक दृष्टीकोन या कार्यशाळेच्या आयोजनामुळे निर्माण झाला.कार्यशाळेचे सूत्रसंचालन कु.भाग्यश्री नेहर हिने केले.तर आभार प्रदर्शन प्रा.प्रविण गुल्हाने ह्यांनी केले.

**फलनिष्पत्ती :-**

१) विद्यार्थिनींना विविध स्पर्धा परिक्षेची माहिती ज्ञात झाली.
२) स्पर्धा परिक्षेबद्दलची भिती नाहीशी झाली.
३) विद्यार्थिनीमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला.

## स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन



***मान्यवरांचे स्वागत करतांना***

***मा.प्रा.डॉ.शालिनी पांडे***



***मान्यवरांचे स्वागत करतांना***

***मा.प्रा.जयवंत पराते***



***कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना***

***मा.प्रा.डॉ.शालिनी पांडे***



***कार्यक्रमाचे संचालन करतांना***
***मा.प्रा.मंजुषा धापुडकर***

***मार्गदर्शन करतांना***
***मा.प्रा.श्री.प्रविण मोंढे***





***आभार प्रदर्शन करतांना***
***प्रा.प्रविण गुल्हाने***